Your complimentary use period has ended. Thank you for using PDF Complete.
Click Here to upgrade to Unlimited Pages and Expanded Features

**Rate Fixation of Coir Mattresses**
**"काथ्याच्या वस्तु " या बाबीकरीता दरनिश्चिती**

**महाराष्ट्र शासन**

**उद्योग संचालनालय, नवीन प्रशासन भवन,**

**मध्यवर्ती भांडार खरेदी संघटना, मुंबई - ४०० ०३२.**

**परिपत्रक क्रमांक भांखस/काथ्याच्या वस्तू /दर निश्चिती/(०९)/**

**२००८-२००९/ बी-२४६८७ दिनांक : ०२/०७/२००८**

**वाचा :- १) शासन निर्णय उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग क्र. भांखसं/१०८८/(२५१२)/ उ-६, दि. ०२/०१/१९९२.**
**२) शासन निर्णय क्र. भांखस-१०९२/२४८९६/उद्योग-६, दि. ०७/१०/१९९२.**
**३) उद्योग,ऊर्जा व कामगार विभागाचे पत्र क्र.भाखसं-१०९५/२७२८/ उद्योग-६, दिनांक १९/०६/१९९६.**
**४) मध्यवर्ती भांडार खरेदी संघटनेच्या भांडार खरेदी समिती निर्णय क्र १३६ बैठक दिनांक २०/०६/२००८.**

शासन निर्णय उद्योग,ऊर्जा व कामगार विभाग क्र. भांखस/१०८८/(२५१२)/उ-६, दिनांक २ जानेवारी, १९९२ च्या परिशिष्ट पाचमध्ये शासनाचे इतर संस्थाकडून खरेदी करण्यासाठी आरक्षित केलेल्या विविध वस्तूंची यादी देण्यात आली आहे. याच शासन निर्णयातील परिच्छेद ७ नुसार संबंधित संस्थांकडून पुरवठा करण्यात येणा-या वस्तूंची किंमत ठरविण्याचे अधिकार मध्यवर्ती भांडार खरेदी संघटनेच्या, भांडार खरेदी समितीकडे सोपविण्यात आले आहेत. तसेच शासन निर्णय उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग क्र. भांखस-१०९२/(२२८९६)/उद्योग-६, दिनांक ०७/१०/१९९२ मे. **महिला काथ्या कामगार औद्योगिक सहकारी संस्था, वेंगुर्ला, जि. सिंधुदुर्ग** यांना "**काथ्याच्या वस्तु**" आरक्षित ठेवण्यात आल्या आहेत.

**भांडार खरेदी समिती निर्णय :-** मध्यवर्ती भांडार खरेदी संघटनेच्या भांडार खरेदी समितीने त्यांच्या दिनांक २०/०६/२००८ रोजी झालेल्या बैठकीत महिला काथ्या कामगार औद्योगिक सहकारी संस्था, वेंगुर्ला यांच्या प्रस्तावावर विचार करुन खालील प्रमाणे दरनिश्चिती केली आहे. शासकीय कार्यालयांनी काथ्याच्या वस्तुंची खरेदी करताना महिला काथ्या कामगार औद्योगिक सहकारी संस्था, वेंगुर्ला, जि. सिंधुदुर्ग यांचेकडून पुढील दराने खरेदी करण्यात याव्यात.

Your complimentary use period has ended. Thank you for using PDF Complete.
Click Here to upgrade to Unlimited Pages and Expanded Features

| | | बाबीचे र्देश ईज र लांबी | वजन ग्रॅम | सन २००८-२००९ या वर्षासाठी निश्चित केलेले दर |
|---|---|---|---|---|
| १. | २. | ३. | ४. | ५. |
| १ | काथ्या | ---- | प्रति किलो | **२२.९०** |
| २ | सुंभ | ---- | प्रति किलो | **६०.१०** |
| ३ | राजू | ---- | प्रति किलो | **६८.२०** |
| ४ | पायपूसणी | ---- | प्रति नग | **६९.३०** |
| ५ | मॅटिंग | ---- | प्रति चौरस फूट | **३६.१०** |
| ६ | केरसुणी /खराटा | ---- | प्रति नग | **५१.३०** |
| ७ | काथ्याच्या गाद्या /पिलो / कुशन | २" कापडी कव्हर असलेली | प्रति चौरस फूट | **१३१.२०** |
| ८ | काथ्याच्या गाद्या पिलो / कुशन | २" रेक्झिन कव्हर असलेली | प्रति चौरस फूट | **१५०.२०** |
| ९ | काथ्याच्या गाद्या पिलो / कुशन | ३" कापडी कव्हर असलेली | प्रति चौरस फूट | **१४१.००** |
| १० | काथ्याच्या गाद्या पिलो / कुशन | ३" रेक्झिन कव्हर असलेली | प्रति चौरस फूट | **१५९.३०** |
| ११ | काथ्याच्या गाद्या पिलो / कुशन | ४" कापडी कव्हर असलेली | प्रति चौरस फूट | **१७६.५०** |
| १२ | काथ्याच्या गाद्या पिलो / कुशन | ४" रेक्झिन कव्हर असलेली | प्रति चौरस फूट | **१९३.७०** |
| १३ | फोल्डींग काथ्याच्या गाद्या /बैठक व्यवस्था | २" कापडी कव्हर असलेली | प्रति चौरस फूट | **१४५.००** |
| १४ | फोल्डींग काथ्याच्या गाद्या /बैठक व्यवस्था | २" रेक्झिन कव्हर असलेली | प्रति चौरस फूट | **१६३.९०** |

**मागणीकार कार्यालयाने पुरवठा आदेश वरील संस्थेच्या नावे निर्गमित करावा.**

वरील निश्चित केलेले दर हे दिनांक ३०/०६/२००९ पर्यंतच्या कालवधीसाठी निश्चित करण्यात आले आहेत. ते एफ.ओ.आर. डेस्टीनेशन सर्व समाविष्टीत असे असून त्यात विक्रीकर व उत्पादन शुल्काचा समावेश आहे. जकात कर माफी प्रमाणपत्र खरेदीदार कार्यालयानी द्यावयाचे आहे.

**पुरवठा कालावधी :-** मागणीपत्र मिळाल्यापासून जास्तीत जास्त १० आठवडयाच्या आत मालाचा पुरवठा करणे आवश्यक आहे.

**देय रक्कमेबाबतच्या अटी :-** मागणीकाराला माल प्राप्त झाल्यानंतर ९०% रक्कम २ आठवडयामध्ये द्यावयाची आहे. व उर्वरित १०% रक्कम सर्व मालाची मागणीकाराला पोच सुस्थितीत व विनिर्देश प्रमाणे झाल्यानंतर ३० दिवसापर्यंत करणे आवश्यक आहे. पुरवठा कालावधीमध्ये मालाचा पुरवठा न

Your complimentary use period has ended. Thank you for using PDF Complete.
Click Here to upgrade to Unlimited Pages and Expanded Features

ा मालाच्या किंमतीवर ½ % प्रती आठवडा प्रमाणे दंड मागणीकारा

ी कमाल मर्यादा खालीलप्रमाणे असेल.

(अ) पुरवठा कालावधीमध्ये पुरवठा न केलेल्या मालाची किंमत एक लाखापेक्षा कमी असेल तर अशा किंमतीच्या १० % दंड .

(ब) पुरवठा कालावधीमध्ये पुरवठा न केलेल्या मालाची किंमत एक लाखापेक्षा जास्त असेल तर अशा किंमतीच्या ५% दंड

सदरील दंडाची वसूली करण्याची संपूर्ण जबाबदारी मागणीकाराची असले

**सर्व शासकिय/निमशासकिय कार्यालयांना काथ्याच्या वस्तुंची खरेदी दरनिश्चिती परिपत्रकानुसार आरक्षित संस्थांकडुनच करणे बंधनकारक आहे.**

(बी.व्ही.राठोड )
उद्योग सह संचालक (भां.ख.)
विकास आयुक्त (उद्योग) यांचेकरिता.

प्रति,

१) महिला काथ्या कामगार औद्योगिक सहकारी संस्था, वेंगुर्ला, जि. सिंधुदुर्ग.